DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE

# SHREE SHIVAJI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, RAJURA, DIST. CHANDRAPUR

IN COLLABORATION WITH

RAJYASHASTRA PRADHYAPAK PARISHAD (VIDARBHA PRANT) Reg. No. F-35406(NGP)

AND

GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

ORGANIZED

One Day Interdisciplinary National Conference on

## Indian Democracy and Media

## CERTIFICATE

This is to certify that Prof./Dr/Mr/Ms./Mrs. Vinod Babasaheb Khedkar of Dr. M. K. Umathe College, Nagpur has participated in the Interdisciplinary National Conference on 'Indian Democracy and Media' organized by Rajyashastra Pradhyapak Parishad (Vidarbh Prant), Gondwana University, Gadchiroli & Department of Political Science, Shivaji Arts, Commerce and Science College, Rajura, Dist. Chandrapur on 5th January 2019. He / She submitted / presented a paper entitled भारतीय राजकारण आणि प्रसारमाध्यमे

Dr Rajendra S. Muddamwar
Convenor
Head Department of Political Science
Shri Shivaji Arts, Comm. & Sci. College, Rajura

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

Dr S. M. Warkad
Principal
Shri Shivaji Arts, Comm. & Sci. College, Rajura

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

Dr Mrs. Alka Deshmukh
President
Rajyashastra Pradhyapak Parishad
(Vidarbh Prant)


ISSN : 2278-31-80

# सामान्यजन संदेश

विशेषांक

५ जाने. २०१९

# भारतीय लोकशाही आणि प्रसारमाध्यमे




लोहिया अध्ययन केंद्र, नागपुर का प्रकाशन

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

३४. भारतीय सार्वत्रिक निवडणूकात प्रसारमाध्यमांची भूमिका....................................११९
डॉ.दिनकर चौधरी
३५. जागतिकीकरणाचे भारतीय प्रसार माध्यमांवरील परिणाम....................................१२३
डॉ. आस्तीक मुंगमोडे
३६. प्रसार माध्यमे आणि निवडणूका....................................१२७
पौर्णिमा गणविर
३७.भारतीय राजकारणावर प्रसार माध्यमांचा प्रभाव....................................१३२
डॉ. प्रमोद आचेगावे
३८.भारतीय निवडणूक आणि प्रसारमाध्यम....................................१३४
प्रा. विश्वनाथ दरेकर
३९. भारतीय निवडणुकांत प्रसारमाध्यमांची भुमिका....................................१३९
डॉ. सुपदा इंगळे
४०. समाज माध्यमे, राजकीय पक्ष आणि मतदार....................................१४२
राहुल बावगे
४१. भारतीय राजकारण आणि प्रसारमाध्यमे....................................१४५
डॉ. कल्पना टेकाडे
प्रा. विनोद खेडकर
४२. भारतीय राजकारणात सोशल मिडियाची भूमिका....................................१४९
डॉ. अमर बोंदरे
४३. निवडणूका व प्रसार माध्यमे....................................१५५
डॉ. संपदा कुल्लरवार
४४. प्रसार माध्यमांची समाजाविषयीची भूमिका....................................१५८
डॉ. कुंदा ठेपाले
४५. लोकशाहीत्मक व्यवस्थेत प्रसार माध्यमांची विभिन्न भूमिका आणि आव्हाने....................................१६४
प्रा. राजु लिपटे
४६. कृषी विस्तारात बदलत्या सामाजिक माध्यमाचा वापर....................................१६७
प्रा. राजेंद्र मालेकर
४७. भारतीय राष्ट्रीय आंदोलनात देशी वृत्तपत्रांचे योगदान....................................१७२
डॉ. अनिल शिंदे
डॉ. प्रमोद घ्यार
४७. सामाजिक मुल्यांचा ऱ्हास आणि सामाजिक माध्यमे....................................१७७
डॉ. राजेंद्र बारसागडे
४८. अभिव्यक्ती स्वातंत्र्य व सोशल मिडिया....................................१८१
डॉ. विनोद गायकवाड

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

आपण विचार केला तर टेलिव्हीजनचा फार मोठ्या प्रमाणात प्रसार झालेला आहे. भारताच्या संदर्भात बोलायचे झाले तर आज भारताच्या २०१४ च्या निवडणूका झाल्या त्या निवडणूकात सर्वात मोठा वाटा टेलिव्हीजनचा असलेला दिसून येतो आणि भविष्यातही याचा सर्वात सर्वात जास्त वाटा राजकारणात राहणार हे निश्चितच आहे. आज आपण पाहतो की, प्रत्येक चॉनल हे कोणत्याही पक्षाला बांधील आहे त्यामुळे हे माध्यम सुद्धा राजकारणांचीच भूमिका मांडतांना दिसतात. हि चॉनल्र्स जनतेच्या समस्येकडे लक्ष देत नाही. प्रत्येक चॉनल हे आपला टि.आर.पी. कसा वाढेल हेच पाहते त्यामुळे त्यांची बातमी खरी का खोटी यावर त्यांचा काहीच भर नसतो. तसेच ही बाब राजकीय पक्षाला फायदेशीर असली तरी सर्वसामान्यांसाठी ती घातक अशीच आहे. असे असले तरी आज भारत सरकारने संपूर्ण देशात जनतेला माहितीचा अधिकार प्रदान केल्यामुळे भारतीय प्रसार माध्यमांचे स्थान आणि भारतातील नागरिकांचे मुलभूत हक्क अधिक मजबूत झाले आहेत. प्रशासकीय स्तरावरील कामकाज पूर्ण पारदर्शक करण्याबरोबरच माहिती अधिकाराच्या माध्यमातून प्रसार माध्यमांची जोड दिली तर सर्वांगिण विकासाचे चक्र अधिक गतीमान करता येईल व त्यातून सामुहीक विकासाचे फळ अखेरच्या घटकांपर्यंत पोहचविणे शक्य होईल.

माहिती अधिकार व प्रसारमाध्यमे या दोन्ही परस्पर पुरक व परस्परांशी निगडीत बाबी आहेत. माहिती अधिकार हा गावगावातील अखेरच्या घटकांपर्यंत रुजविण्याची व माहिती अधिकार कायद्यास जन सामान्यामध्ये स्थान करुन देण्याची महत्वपूर्ण जबाबदारी भारतीय प्रसार माध्यमावर आली आहे. प्रसार माध्यमांचे महत्व केवळ माहिती किंवा प्रचार प्रसार आणि जनशिक्षणापुरतेच मर्यादित राहीलेले नाही तर सामाजिक, राजकीय, औद्योगिक, सहकार, शिक्षण आदि क्षेत्रात प्रसार माध्यमांनी आपले महत्वपूर्ण स्थान निर्माण केले आहे. प्रसार माध्यम हे राजकारणात फार मोठी भूमिका बजावतात. विल्यम रिव्हार्सारख्या जागतिक किर्तीच्या माध्यम तज्ञांनी म्हटले आहे की, Media is the maker of the image, media is the breaker of the image, media is the maker of the government अशा प्रकारे प्रसारमाध्यमाचे महत्व विशद करण्यात आले आहे.

## सोशिअल मिडीया व राजकारण

सध्या माहितीचे आणि संदेशाचे वहन इतके जलदगतीने होत आहे की, १ सेकंदापूर्वी काय घडले याच्या अपडेट्स ट्विटर किंवा व्हॉट्सॲप यांसारख्या सोशल साईड्सवरुन त्वरित प्रसारित होत असतात. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी संदेशवहनाचे प्रमाण सध्या झटपट होताना दिसत आहे. माध्यमांचा वापर दिवसेंदिवस वाढत असून वृत्तपत्र आणि माध्यमांची जागा फेसबुक व व्हॉट्सॲपने घेतली आहे. आज आपल्याला असे दिसून येते की, भारतीय राजकारणात सोशिअल मिडीयाचा मोठ्या प्रमाणात वापर केल्या जातो. सध्या प्रत्येक राजकीय नेता हा ट्विटर, व्हॉट्सॲप, फेसबुक यासारख्या सोशिअल मिडीयाचा वापर करतांना दिसून येतात व या माध्यमातून जनतेशी जुडून राहण्याचा प्रयत्न करतात. आपल्या देशाचे आजचे प्रधानमंत्री प्रत्येक अपडेट्स आपल्या ट्विटर अकाऊंट वरुन देत असतात. यावरुन सोशिअल मिडीयाचे महत्व लक्षात येते. असे असले तरी फेसबुक व व्हॉट्सॲपमुळ माहितीचे मूल्ये ढळली आहेत कारण बऱ्याच वेळा एखाद्या राजकीय नेत्यांची मते ही विर्पयास करुन मांडण्यात येतात. त्यामुळे सामाजिक स्वास्थ बिघडते व राजकीय वातावरण हे दुषित होते. बऱ्याच वेळा चुकीच्या मॉसेजमुळे राजकीय वर्तूळात खळबळ होतांना दिसून येते.



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

मते आपल्या पक्षाला पडावी या मताचा असतो यामुळे ते राजकीय नेते त्या पक्षाचा प्रसार प्रचार करत असतात. परंतु एक्झिट पोलमुळे त्यांची ध्येय धोरणे बदलतात. त्यामुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे एक्झिट पोलचा धर्म व्यवस्थेवरसुद्धा प्रभाव पडतांना दिसतो. तसेच एक्झिट पोलमुळे राजकीय पक्षांची ध्येय धोरणे तर बदलताच परंतु कधी कधी राजकीय पक्षात सुद्धा फुट पडतांना दिसते. यावरुन लक्षात येते की प्रसार माध्यमांचा व राजकारणाचा जवळचा संबंध आहे.

असे असले तरी बरीच प्रसार माध्यमे ही राजकीय पक्षांची मक्तेदारी बनलेली आहेत किंवा फक्त त्या त्या पक्षाचीच माहिती दाखविणे व प्रसारीत करणे एवढेच कार्य प्रसार माध्यमे करतांना दिसतात. याचे कारण म्हणजे अर्थकारण होय. सत्तेवर आलेला पक्ष हा बऱ्याच चॅानल्सला पैसा पुरवितात व फक्त आपल्या पक्षा संदर्भातच माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याचे सांगातात. त्यामुळे प्रसार माध्यमेसुद्धा सत्ताधारी पक्षांची गुलामगिरी करतांना दिसतात. सत्तेत आलेला राजकीय पक्ष त्या त्या प्रसार माध्यमांचा उपयोग आपण केलेले कामे आणि विरोधी पक्षांची मुस्कटदाबी करण्यासाठी करतात. बऱ्याच वेळा याचा वाईटही परिणाम होतो. परंतु प्रसार माध्यमे याचा विचार करतांना दिसत नाही. यावरुन लक्षात येते की, प्रसार माध्यमांचा राजकारणांवर व राजकारणांचा प्रसार माध्यमांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव पडत असतो.

एकूणच असे लक्षात येते की, लोकशाहीमध्ये जी भूमिका प्रसार माध्यमांची असायला पाहीजे ती भूमिका प्रसार माध्यमांनी टिकवून ठेवलेल दिसत नाही. प्रसार माध्यमांमध्ये इतकी ताकद असते की, प्रसार माध्यमे सरकार सत्तेवर आनु शकतात आणि सत्तेवरुन खाली खेचूही शकतात. परंतु ती ताकद आज प्रसार माध्यमामध्ये राहलेली दिसत नाही कारण प्रत्येक वृत्तपत्र, प्रत्येक चॅनल ही राजकीय नेत्यांची वैयक्तिक मालमत्ता झालेली दिसून येतात. त्यामुळे प्रसार माध्यमे ही राजकीय पुढाऱ्यांची हस्तके बनली आहेत. म्हणून या प्रसार माध्यमाकडून जनसामान्यांची फसवणूक होतांना दिसून येते. आता तर जनता सुद्धा या गोष्टीकडे लक्ष देत नाही त्यांना याची सवय लागलेली आहे.

सद्याच्या स्थितीत तर भारतीय तरुण आपल्या अवती भोवती काय घडत आहे याकडे लक्ष न देता फक्त फेसबुक व व्हॉट्सअॅप या माध्यमांचा उपयोग करतांना दिसतो व या गोष्टचा फायदा भारतीय राजकीय पुढऱ्यांनी घेतला आहे. ते सुद्धा भारतीय तरुणांना इंटरनेट फ्री ची व्यवस्था करुन देऊन तरुणांची फसवणूक करतांना दिसत आहे. कारण आज भारतीय तरुणांना रोजगाराची गरज असतांना त्याला वेगळ्याच गोष्टीमध्ये गुंतवूण ठेवण्यात येत आहे आणि आताच्या सरकारमध्ये हे प्रकर्षाने होतांना दिसून येते. यावरुन लक्षात येते की, राजकीय नेते हे सोशिअल मिडीयाचा वापर करुन जनतेची कशी फसवणूक करतात. असे असले तरी प्रसार माध्यमे ही लोकशाहीचा गाभा असल्याने त्यांना अनन्य साधारण महत्व आहे. अशा प्रकारे भारतीय राजकारणात प्रसार माध्यमांची महत्वाची भूमिका राहीलेली दिसून येते. आजचे भारतीय राजकारण व प्रसार माध्यमे यांची जवळीकता पाहून राजकारण व प्रसार माध्यमे हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

★★★



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR
PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022